**<u>रे.दि.मु.क्र.१६७/२०११</u>**
**राजु वसंत थोरवडे**
**वि.**
**यशवंत जाधव वगैरे**

**<u>रे.दि.मु.नं. १६७/२०११ मधील निशाणी १३५ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज, प्रतिवादी क्र १, २, ४अ, ४ब, ६अ, ६ब, ७ यांनी त्यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणेत येवून विनाकैफियतचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करणेची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र १, २, ४अ, ४ब, ६अ, ६ब, ७ यांचे म्हणण्यानुसार, त्यांच्याविरुद्ध वादीने रजिस्टर खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेसाठी, वाद मिळकतीमध्ये वादीची मालकी जाहिर होऊन मिळणेसाठी, हुकुमी ताकीदीने बांधकाम पाडुन मिळणेसाठी व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला असुन वादींनी दावा कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणताही पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही. ३७ वर्षापासुन दावा मिळकतीवर प्रतिवादींचा कब्जा आहे. त्यामुळे दावा या स्वरुपात चालु शकत नसलेबाबत अर्ज देऊन प्राथमिक मुद्दा काढुन न्यायनिर्णीत करणेत आला आहे. सदरील आदेशाविरुद्ध त्यांनी मा. ना. मुंबई उच्च न्यायालयात civil reivision petition no. 1053/2014 दाखल केला असुन आजअखेर प्रलंबित आहे. तदनंतर वादीने ताकीदीचा अर्ज दाखल केला असुन तो गुणावगुणावर फेटाळण्यात आला. त्यावर वादीने पुन्हा जिल्हा न्यायालयात कि.दि.अपील नं. ५०/२०१९ दाखल केला परंतु नंतर विनाशर्त काढुन घेतला. तसेच वादीने रिट पिटीशन नं. ४८७१/२०२१ दाखल करुन पुन्हा काढुन घेतली. वादीने दावा मिळकतीची मोजणी होऊन मिळणेकामी कोर्ट कमिशन अर्ज दाखल केला प्रथम तो फेटाळण्यात आल्यानंतर त्यांनी पुन्हा अर्जाबाबत पुर्नविलोकन अर्ज दाखल केला. तदनंतर प्रतिवादींचेविरुद्ध कराड न्यायालयात रे.दि. मु. १५५/२०२० दाखल केला. अशा अनेक कारणांमुळे दावा कायमच तजवीज करणेवर बोर्डावर राहिल्याने No Written Statement चा हुकुम झाला. प्रतिवादींचा आवश्यक तो बचाव पुराव्यासहित न्यायालयासमोर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे विनाकैफियतचा झालेला आदेश रद्द होऊन मिळणे आवश्यक आहे. प्रतिवादींची

कैफियत दाखल झाल्यास न्यायदानास मदत होणार असुन दावा गुणावगुणावर चालविणेसाठी त्यांना कैफियत दाखल करणेची संधी देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे कायदेशीर व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादींविरुद्ध कैफियत व म्हणणे स्विकारणेबाबत हुकुम व्हावा ही विनंती केली आहे.

३. सदर अर्जावर वादी यांनी म्हणणे **(नि.१३८)** दाखल करुन प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज, खोटा व लबाडीचा असलेने तो वादीस मान्य व कबुल नाही. त्यांनी प्रतिवादींनी दावा मिळकतीचे घेतलेले खरेदीपत्र बेकायदेशीर असुन खरेदीपत्र रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला असुन प्रतिवादींना दि. २३.०७.२०११ रोजी समन्स मिळाले असुन ते दि. २९.०७.२०११ रोजी वकीलांमार्फत हजर झाले. त्यानंतर प्रतिवादीने सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल (११)(d) प्रमाणे अर्ज दिला असुन त्यांनी वेळोवेळी दिलेल्या अर्जावर म्हणणे दाखल केले व युक्तीवाद केलेला आहे. प्रतिवादी हे सन २०११ पासुन आजअखेर नेमले तारखेस न्यायालयात हजर राहत असुन त्यांचा सी.पी.सी. ऑर्डर ७ रुल (११)(d) अर्ज नामंजुर झाला आहे. सदर निर्णयावर हायकोर्टात सिविल रिट पिटीशन प्रलंबित आहे. याचा अर्थ प्रतिवादी दाव्याचे कामी हजर असुन त्यास संपुर्ण दाव्याची व तारखांची माहिती आहे. प्रतिवादींना दाव्याचे समन्स मिळालेनंतर ९० दिवसांचे आत दाव्यास कैफियत दाखल करणे कायदयाने बंधनकारक असताना प्रतिवादींनी हेतुपुरस्कर वादीच्या दाव्याचे कामकाज लांबवणेचे उद्देशाने जाणुनबुजुन मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. सबब र.रु. २५,०००/– कॉस्ट लादुन अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा जाहिर ठराव, हुकुमी ताकीदीकरीता व अतिक्रमीत क्षेत्र पुर्ववत होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी हे दाव्याकामी हजर झाले परंतु त्यास कैफियत दाखल करण्यास १२ वर्षांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी सदर विलंबाचे स्पष्टीकरण म्हणुन अन्य अर्ज व अपिल प्रलंबित असल्याचे सांगितले. तसेच त्याकरीता प्रतिज्ञापत्र (**नि.१३६**) दाखल केलेले आहे. प्रतिवादींना सदर अर्ज करण्याकरीता जवळजवळ १२ वर्षांचा विलंब झालेला आहे. असे असले तरी दावा गुणदोषावर चालविण्यासाठी व दाव्याच्या निर्णयासाठी प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करुन घेतले नाहीतर त्यांचे अपिरिमित असे नुकसान होईल. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातुन त्यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी कैफियत दाखल करण्याची

संधी देणे योग्य राहील. तथापि, सदर विलंबामुळे दाव्याच्या प्रगतीस विलंब झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावर खर्च लादून कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र १, २, ४अ, ४ब, ६अ, ६ब, ७ यांचा निशाणी १३५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्यांच्यावर प्रत्येकी खर्च रक्कम रुपये १,०००/–(एक हजार रुपये मात्र) लादून कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व कैफियत दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

३. खर्चाची रक्कम वादीला अदा केल्यानंतर प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRAJAKTA GAJANAN SHELAR
Date: 2025.02.01 16:54:53 +0530

स्थळ – कराड (पी. जी. शेलार)

दिनांक–०१.०२.२०२५ ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कराड